ECONET

# ओळख वन हक्क कायद्याची

चला, सोप्या पद्धतीने वनहक्क कायदा समजून घेऊया !














Shot on vivo Z1Pro
Vivo AI camera
2024.05.12 13:26


Shot on vivo Z1Pro
Vivo AI camera
2022.09.06 14:45


Shot on vivo Z1Pro
Vivo AI camera
2023.05.09 11:24

# ओळख वनहक्क कायद्याची

चला, सोप्या पद्धतीने वनहक्क कायदा समजून घेऊया!

**इकोनेट**
फ्लॅट नं. २, गुलमोहर ओरीयन, एस.आर.पी.एफ. गेट नं १ जवळ,
सर्व्हे नं. ११०/अ/९, रामटेकडी रोड, हडपसर,
पुणे : ४११ ०१३, महाराष्ट्र.
फोन : (+९१) ७४२००२७७५५
इमेल : econet.pune@gmail.com वेबसाईट : www.econetindia.org

# ओळख वन हक्क कायद्याची

**प्रक्रिया नोंद पुस्तिका** — पाऊले चालती वनहक्काची वाट

**संकल्पना** — गौरी भोपटकर

**लेखिन** — अमृता वाळिंबे

**मार्गदर्शन** — जितेंद्र कठाळे

**छायाचित्र आणि मुखपृष्ठ** — राहुल साळवी

**विशेष आभार** — अमित कुलकर्णी
काळू निरगुडे
भाऊ गडगे
बन्सी परते
काशिनाथ सलाम

# ऋणनिर्देश

'पाऊले चालती वनहक्काची वाट : ओळख वनहक्क कायद्याची' ही एक सोप्या भाषेत वनहक्क कायद्यांमधील महत्त्वाच्या तरतुदी सांगणारी पुस्तिका अगदी तळागाळातल्या भागात या कायद्याच्या संदर्भाने काम करणारे कार्यकर्ते व समुदायातील लोक यांना वनहक्क कायद्याच्या तरतुदी समजाव्यात यादृष्टीने या माहितीपुस्तीकीचे निर्मिती करण्यात आलेली आहे. या पुस्तिकेत वनहक्क कायद्यातील मूळ कायदेशीर भाषेचा अर्थ बदलणार नाही आणि त्या तरतुदी नुसत्या वाचून समजूनसुद्धा घेता येतील या दृष्टीने या कायद्यातील महत्त्वाच्या बाबींची मांडणी करण्यात आलेली आहे. ही माहितीपुस्तिका तयार करताना अनेक व्यक्तींचा सहभाग मिळाला आहे, आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभारी आहोत. या प्रक्रिया पुस्तिकेमधील माहितीचा उपयोग वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया व कायदा समजून घेण्यासाठी होऊ शकेल. सोप्या पद्धतीने ही माहितीपुस्तिका तयार करण्यासाठी शासनाच्या आणि इतर सामाजिक संस्था-संघटनांच्या वेबसाईट्स व मार्गदर्शनपर माहितीपुस्तिकांचा आधार घेतला आहे. तसेच या कामाला कार्यक्षेत्रातील गावे / पाडे / तांडे व ग्रामपंचायत सदस्यांचाही हातभार लागला आहे. त्या सर्वांचे आभार. सोबतच गावात काम करणाऱ्या सामाजिक संस्था, स्थानिक समुदाय यांचेही मनापासून आभार. या पुस्तिकेसाठी माहिती संकलन व काम मोलाचे काम करणाऱ्या अमृता वाळिंबे यांचेही आभार. सर्वात शेवटी पण म्हत्त्वाचे म्हणजे कार्यक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सर्व क्षेत्रीय सहभागी व्यक्ती / समन्वयक आणि संस्था त्याचबरोबर इकोनेट टीम या सर्वांचेही आभार. या सर्वांनी या कामासाठी दिलेले योगदान खूप मोलाचे आहे.

**इकोनेट,**
पुणे.

# प्रस्तावना

भारतातील आदिवासी समुदाय हे पूर्वीपासूनच जंगलात राहणारे इथले मूळ रहिवासी आहेत. आदिवासी समाज आपल्या मूलभूत गरजा, उपजीविका, संस्कृती व परंपरा यासारख्या आवश्यक बार्बीसाठी जंगलावरच अवलंबून असतो. पण आदिवासींच्या जंगलाशी असलेल्या या पूर्वापार नात्याची, अवलंबित्वाची आणि पारंपरिक हक्काची दखल शासनाने कधीही घेतली नव्हती. आदिवासींनी जंगल पूर्वीपासूनच राखले आहे, सांभाळले आणि संवर्धित केले आहे हेही कायद्याच्या दृष्टीने मानले जात नव्हते. उलट आदिवासी ज्या जल, जंगल, जमिनीची पोटच्या पोराप्रमाणे काळजी वाहत होते ती जंगलसंपत्ती आत्ताआत्तापर्यंत जमीनदार, ठेकेदार, व्यापारी, ब्रिटीश कायदेकानू यांच्या अन्याय्य नियंत्रणात होती.

भारतातल्या सर्वसामान्य आदिवासी समुदायांवर पूर्वीपासून अन्याय होत आला. ब्रिटीशांचे भारतावर राज्य असताना त्यांना रेल्वे, जहाजबांधणी व इमारतीसाठी मोठ्या प्रमाणात जंगलातील लाकडाची गरज होती. परंतु बऱ्याच ठिकाणी आदिवासी समुदायाने ब्रिटिशांच्या जंगलतोडीस विरोध केला. या कारणास्तव ब्रिटिशांनी जंगलासंबंधी काही जाचक कायदे केले आणि त्यामुळे आदिवासींना त्यांच्याच जंगलात व जमिनीवर अन्याय्य नियमांच्या जोखडात बांधले गेले. ब्रिटिशांनी त्या वेळेस केलेले बरेचसे कायदे भारत स्वतंत्र झाल्यावरही

लागू राहिले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही सरकारने आदिवासींच्या हक्कांवर वेगवेगळ्या जंगल व वन्य प्राणी संरक्षण कायद्याअंतर्गत अनेक बंधने घातली. विकासकामांच्या नावावर बऱ्याच आदिवासींना त्यांच्या जंगल अधिकाराचा पुरेसा मोबदला न मिळाल्याशिवाय त्याच्या राहत्या ठिकाणावरून इतर ठिकाणी विस्थापित होण्यास भाग पाडले गेले.

स्वातंत्र्यानंतरच्या काळात वेगवेगळ्या जाचक कायदेशीर बंधनांमुळे आदिवासींना जंगल हे आपले नसून सरकारचे किंवा वनखात्याचे आहे असे वाटायला लागले. आपणही जंगल संवर्धन, संरक्षण व व्यवस्थापनातील अतिशय महत्वाचे भागधारक आहोत याचा त्यांना विसर पडत चालला. या वस्तुस्थितीला छेद देण्यासाठी आदिवासींच्या व जंगलावर आधारित इतर समाजाच्या जंगलावरील पारंपरिक हक्कांना मान्यता देण्यासाठी वनहक्क कायदा पारित करण्यात आला. भारतभरात हा कायदा २००६ पासून लागू आहे. या कायद्यात नमूद केलेल्या / मान्यता दिलेल्या हक्कांमध्ये जंगलाचा योग्य वापर, जंगलाचे संवर्धन व संरक्षण, निसर्गातील विविधतेचे जतन व संरक्षण आणि पर्यावरणाचे संतुलन यासारख्या जबाबदाऱ्यांचाही समावेश केला गेला आहे.

वनहक्क कायदा हा आदिवासी व जंगलावर अवलंबून असणाऱ्या इतर पारंपरिक वन निवासींच्या वनहक्कांना कायदेशीर मान्यता देण्यासाठीचा कायदा आहे. वनहक्क कायदा २००६, नियम २००८ व सुधारित नियम २०1२ यांच्या तरतुदी व वनहक्क मान्यतेच्या प्रक्रिया

सोप्या भाषेमध्ये मांडण्याचा प्रयत्न या पुस्तकेमध्ये केला आहे. तसेच ही पुस्तिका तयार करताना आदिवासी मंत्रालय, भारत सरकार यांनी कायद्याच्या तरतुदींबद्दल वेळोवेळी दिलेल्या स्पष्टीकरणाचा आधार घेण्यात आला आहे. या पुस्तकाचा उपयोग वनहक्क कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आदिवासी समुदाय, आदिवासी भागातील स्थानिक संस्था–संघटना, कार्यकर्ते व हितसंबंधी समुदायांना होईल अशी आशा वाटते. वनहक्क कायदा २००६ची माहिती सोप्या पद्धतीने लिहिताना अनवधानाने काही चुका झाल्या असतील किंवा त्यात काही त्रुटी राहिल्या असतील कृपया आम्हास कळवावे. ही पुस्तिका वनहक्क कायदा व त्याच्या अंमलबजावणीची प्रक्रिया समजावी म्हणून तयार केली आहे. परंतु कायद्याची तपशीलवार कलमं, अनुच्छेद असे तपशील व सविस्तर माहितीसाठी वनहक्क कायद्याच्या मूळ प्रतीचा उपयोग करावा.

संस्थेचा पत्ताः–

**इकोनेट संस्था पुणे**

गुलमोहर ओरीअन, सर्व्हे नं. ११०/अ/९, एस.आर.पी.एफ.

गेट नं. १ जवळ. रामटेकडी, पुणे : ४११ ०१३.

फोन :– ७४२००२७७५५.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | हे आपल्याला माहीत हवं | ०८ |
| २ | वनहक्क दाव्यांविषयी | १० |
| ३ | पुरावे व पडताळणीविषयी | १३ |
| ४ | वनहक्क मान्यता प्रक्रियेविषयी | १७ |
| ५ | वनहक्क समितीविषयी | २० |
| ६ | वन व्यवस्थापन समितीविषयी | २७ |
| ७ | वनहक्क मिळवणाऱ्या व्यक्ती व समूहांच्या अधिकार व जबाबदाऱ्यांविषयी | ३० |
| ८ | गरज प्रभावी अंमलबजावणीची! | ३२ |

# वनहक्क कायदा

हे आपल्याला माहीत हवं!

### ✻ वन हक्क कायदा कुणासाठी आहे?

वन निवासी अनुसूचित जमाती
आणि
इतर पारंपरिक वन निवासी

### ✻ या कायद्याचं अधिकृत नाव काय?

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्क मान्य करणे) अधिनियम २००६

### ✻ या कायद्याचा मुख्य हेतू काय?

- पिढ्यान् पिढ्या जंगलात राहणाऱ्यांचे, जंगलावर अवलंबून असणाऱ्यांचे न्याय वनहक्क प्रस्थापित करणं
- जैवविविधता संरक्षण व पर्यावरण संतुलनासाठी संवर्धनाचे अधिकार गाव–समाजाला देऊन वनव्याप्त क्षेत्राची विकासप्रक्रिया बळकट करणं
- स्थानिक आदिवासी जनतेची उपजीविका व अन्नसुरक्षा यांची हमी देणं
- शासकीय योजनांमुळे उपजीविका क्षेत्रामधून विस्थापित झालेल्यांनाही न्याय देणं

### ✻ वनांचे प्रकार कोणते?

प्रशासकीय दृष्टिकोनातून वनांचे प्रामुख्याने दोन प्रकार पडतात.

- संरक्षित वनं/जंगलं – या वनांची सरकारकडून काळजी घेतली जाते. या वन क्षेत्रात स्थानिक लोकांना वनोपज गोळा करण्यास व गुरं चारण्यास परवानगी असते.
- राखीव वनं /जंगलं – या वनांवर सरकारची देखरेख असते. वनोपज मिळवणं आणि गुरं चारणं यासाठी इथे मुक्त प्रवेश मिळत नाही.

## ✻ वन निवासी अनुसूचित जमाती म्हणजे काय?

- वनात राहणारे अनुसूचित जमातींचे सदस्य किंवा समाज
- पोटापाण्याच्या गरजांसाठी वनावर किंवा वनजमिनीवर अवलंबून असलेला समाज

## ✻ अनुसूचित जमातीचं प्रमाणपत्र नसेल तर काय करता येतं?

- कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शाळेच्या दाखल्यावर जातीची नोंद असेल तर ती या कायद्यासाठी ग्राह्य धरता येते
- नातेवाईकांच्या शाळेच्या दाखल्यावरील जातीची नोंद ग्राह्य धरता येते
- जातीबद्दल शंका असल्यास वनहक्क समिती अर्जदारास निर्देश देऊन उपविभागीय अधिकाऱ्यांकडून जातीचा दाखला घेऊन अर्जासोबत सादर करायला सांगू शकतात
- शंका असल्यास, जातीचा दाखला जात पडताळणी समितीकडून पडताळून घेण्याचा आदेश उपविभागीय समिती अर्जदारास देऊ शकते.

## ✻ इतर पारंपरिक वन निवासी म्हणजे काय?

- १३ डिसेंबर २००५ पूर्वी किमान ३ पिढ्यांपासून वनात राहणारा आणि पोटापाण्याच्या गरजांसाठी वनावर किंवा वन जमिनीवर अवलंबून असलेला सदस्य किंवा समाज. (कायद्यानुसार एक पिढी म्हणजे पंचवीस वर्षे)

## ✻ हा कायदा कोणकोणते हक्क देतो?

- धारण केलेल्या किंवा लागवडीखालील जमिनीचा हक्क
- गौण वनोपजावरील हक्क
- जमीन वापराचा हक्क
- गुरं चारणं, मासेमारी इत्यादीचा हक्क
- घरांचा हक्क
- निवासस्थानाचा हक्क (फक्त शेतीपूर्व समूह व आदिम आदिवासी गटांसाठी)
- पुनर्वसनाचा हक्क

✻✻✻

# वनहक्क दाव्यांविषयी

## ✻ वन हक्क मागायचा असतो की या हक्कावर दावा करायचा असतो?

हक्कदाराने वन हक्काची मागणी करणं अपेक्षित नाही.

हक्कदाराने वन हक्काचा दावा दाखल करणं अपेक्षित आहे.

## ✻ हक्क मिळवण्यासाठी कोणते दावे करता येतात?

- वैयक्तिक वन हक्क
- सामूहिक वन हक्क

## ✻ दावे कोण करू शकतं?

- वैयक्तिक दावे व्यक्ती स्वत: करते. त्यासाठी ‘फॉर्म ए’ भरून दाखल करावा लागतो.
- सामूहिक दावे ग्रामसभा करते. त्यासाठी ‘फॉर्म बी’ भरून दाखल करावा लागतो.
- सामूहिक वन संसाधन हक्कासाठी वन हक्क समितीला ग्रामसभेच्या वतीने ‘फॉर्म सी’ भरून दावा दाखल करावा लागतो. हे फॉर्म प्रांत किंवा उपविभागीय कार्यालय व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत मोफत पुरवले जातात.

## ✻ वैयक्तिक वन हक्क कोणते?

- जंगलातली जमीन शेतीसाठी किंवा राहण्यासाठी वापरली जात असेल आणि १३ डिसेंबर २००५ पर्यंत जर ती ताब्यात असेल तर ती मिळवण्याचा हक्क

- गौण वनोपज, सरपण, मासे–खेकडे गोळा करणं, गुरं चारणं असे जंगलावर अवलंबून असलेले सर्व पारंपरिक हक्क

## ✻ कोणते वन हक्क सामूहिक आहेत?

### १. सामूहिक वन संसाधन हक्क

- सामूहिक वन संसाधनांच्या संरक्षण, व्यवस्थापन, संवर्धनाचा अधिकार
- वन्य प्राण्यांचं संरक्षण व संवर्धन करण्याचा हक्क
- जंगलाचं व्यवस्थापन व त्याबद्दलचे नियम ठरवण्याचा हक्क
- इमारती लाकूड वगळून इतर वन उत्पादनाच्या शाश्वत वापरासाठी निर्णय घेण्याचा हक्क

### २. सामूहिक वन हक्क

- निस्तार हक्क
- गावसीमेच्या आतील व बाहेरील जंगलातल्या अकाष्ठ वनोपजावर मालकी हक्क
- मध, बांबू, वेत, फळं, तेंदूपत्ता, लाख, खुरटी झाडी, औषधी वनस्पती, कंदमुळं, रानभाज्या इत्यादी गोळा करण्याचा, त्यांची विक्री करण्याचा, ती वापरण्याचा किंवा प्रक्रिया करून विकण्याचा हक्क
- मासे व पाण्यातील इतर उत्पादन मिळवण्याचा, गुरं चराई व भटक्या जमातींचा हंगामी जंगल वापराचा अधिकार
- वनजमिनीवरून १३ डिसेंबर २००५ पूर्वी अवैधरित्या हाकलून दिलं असेल तर यथायोग्य पुनर्वसनाचा हक्क
- वनगावं व जुनी वसतिस्थानं महसुली गावात रूपांतरित करण्याचा हक्क
- आदिम, विशेष संवेदनशील जमाती, शेतीपूर्व समूहांना निवास व निवासस्थान हक्क आणि सामुदायिक धारणाधिकार

- जंगलातील पायवाटा, देवाची ठिकाणं, गुरं व पिण्याचं पाणी असे सर्व पारंपरिक सामुदायिक हक्क

### ३. गाव विकास योजना हक्क

७५ पेक्षा जास्त झाडं तुटणार नाहीत अशी एक हेक्टरपर्यंतची वन जमीन पुढील गाव विकास योजनांसाठी मिळवण्याचा हक्क –

शाळा, दवाखाना व इस्पितळ, रेशन दुकान, फोन व विजेच्या तारा, टाक्या व पाणवठे, पिण्याचं पाणी व पाईपलाईन, छोटे कालवे, पाट, पाणी व पावसाच्या पाण्याची साठवण व्यवस्था, अपारंपरिक ऊर्जास्रोत, तांत्रिक प्रशिक्षण व कौशल्य विकास वर्ग, अंगणवाडी, रस्ते, समाज भवन / केंद्र

### ✻ दावा करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची तारीख कोणती?

दावा करणाऱ्या व्यक्ती/समूहाचा वन जमिनीवर दि. १३ डिसेंबर २००५ च्या आधी कब्जा असणं आवश्यक! त्यामुळे १३ डिसेंबर २००५ ही तारीख वन हक्काच्या संदर्भात लक्षात ठेवायलाच हवी!

✻✻✻

# पुरावे व पडताळणीविषयी

## * हक्क निश्चितीसाठी कोणते पुरावे द्यावे लागतात?

### १. खालीलपैकी कमीत कमी दोन पुरावे

- सार्वजनिक दस्तऐवज, राजपत्रं, जनगणना, सर्वेक्षण व समझोता अहवाल, नकाशे उपग्रहीय चित्रं, कार्य योजना, व्यवस्थापन योजना, सूक्ष्म योजना, वन चौकशी अहवाल, इतर वन अभिलेख, पट्टा किंवा भाडेपट्टा यांपैकी कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या हक्कांचा अभिलेख यासारखे शासकीय अभिलेख, समित्या किंवा आयोगांचे शासकीय अहवाल, शासकीय आदेश, अधिसूचना, परिपत्रकं, ठराव
- मतदार ओळखपत्र, शिधावाटप पत्रिका, पासपोर्ट, घरपट्टी पोच पावत्या, अधिवास प्रमाणपत्रं यासारखे शासनाने प्राधिकृत केलेले दस्तऐवज
- घर झोपड्या व जमिनीवर केलेल्या स्थायी सुधारणा (उदा– समतलन, बांध बांधणं, रोधी बांध व तत्सम इतर भौतिक गुणविशेष)
- न्यायालयीन आदेश व न्याय निर्णय यांचा समावेश असलेले न्यायिकवत व न्यायिक अभिलेख
- कोणत्याही वनहक्कांचा उपभोग दर्शविणाऱ्या आणि रुढीगत कायद्याचं बळ असणाऱ्या रुढींचं व परंपरांचं भारतीय मानववंशशास्त्रीय सर्वेक्षण संस्थेसाररख्या नामांकित संस्थेने केलेला संशोधनात्मक अभ्यास व लेखांकन
- भूतपूर्व प्रांतिक राज्य किंवा प्रांत किंवा अशा इतर मध्यस्थ संस्थांकडून मिळालेला कोणताही अभिलेख (उदा– नकाशे, हक्कनोंदी, विशेषाधिकार, सूट, अनुग्रह)

- प्राचीनत्व सिद्ध करणाऱ्या पारंपरिक रचना (विहिरी, दफनभूमी, पवित्र स्थळं)
- पूर्वीच्या भूमी अभिलेखात नमूद केलेल्या व्यक्तींच्या पूर्वजांचा माग काढणारी किंवा पूर्वीच्या काळी त्या गावातील कायदेशीर रहिवासी असल्याची ओळख पटवणारी वंशावळ
- मागणीदाराखेरीज अन्य वडीलधाऱ्या माणसाचं लेखनिविष्ट कथन

**२. सामूहिक वन हक्कासाठी इतर गोष्टींबरोबर आवश्यक असलेल्या बाबी**

- सामूहिक हक्क (उदा. निस्तार)
- पारंपरिक चराई मैदानं, मुळं व कंद, वैरण, वन्य खाद्यफळं व इतर गौण वनोत्पादनं, मच्छिमार क्षेत्रं, सिंचन व्यवस्था, मनुष्य किंवा पशूंच्या वापरासाठी पाण्याचे स्रोत, औषधी वनस्पती गोळा करणाऱ्या वनस्पती व्यवसायींचे भूप्रदेश
- स्थानिक समूहाने बांधलेल्या रचनेचे अवशेष, पवित्र झाडं, देवराई, तळी किंवा नदीक्षेत्रं, दफन किंवा दहनभूमी वन हक्क निर्धारित करताना ग्रामसभा, उपविभाग स्तरीय आणि जिल्हास्तरीय समिती वर नमूद केलेल्या बाबींपैकी एकाहून अधिक बाबी विचारात घेतात.

## * दाव्याची पडताळणी कशी केली जाते ?

१. मागणीदारास व वन विभागास वनहक्क समितीकडून सूचना दिली जाते, त्यानंतर –

- समितीकडून जागेला भेट. दाव्याचं स्वरुप, व्याप्ती, पुराव्याची प्रत्यक्ष पडताळणी
- मागणीदार व साक्षीदारांनी सादर केलेला पुरावा समिती स्वीकारते
- फिरते आदिवासी व भटक्या जमातीच्या हक्कमागणीची पडताळणी संबंधित व्यक्ती, समूह वा त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत झाल्याची खात्री समिती करते

- आदिम आदिवासी किंवा कृषि–पूर्व समूहाच्या सदस्यांच्या वसतिस्थानाच्या हक्कमागणीची पडताळणी असे समूह वा त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत झाल्याची खात्री समिती करते
- ओळखता येण्याजोगी सीमा चिन्हं दर्शवून प्रत्येक हक्कमागणीच्या क्षेत्राचा सीमांकन नकाशा समिती तयार करते

**२. माहिती, अभिलेख वा दस्तऐवज मिळण्यासाठी ग्रामसभा किंवा वनहक्क समितीने लेखी विनंती शासकीय विभागास केली तर,**

- संबंधित अधिकारी त्याची अधिप्रमाणित प्रत ग्रामसभेकडे किंवा यथास्थिती वनहक्क समितीकडे पाठवतात
- आवश्यक असल्यास, अधिकृत अधिकाऱ्याद्वारे त्याचा अर्थ सुकर करण्यात येतो

**३. हक्कमागणीवरील निष्कर्ष नोंदवून समिती ते ग्रामसभेपुढे विचारार्थ सादर करते.**

**४. परस्परविरोधी हक्कमागण्यांवर विचार करण्यासाठी संबंधित ग्रामसभांच्या वनहक्क समित्या एकत्र बैठक घेऊन त्यांचे निष्कर्ष संबंधित ग्रामसभांना लेखी सादर करतात**

**५. ग्रामसभा परस्परविरोधी हक्कमागण्या उपविभागस्तरीय समितीकडे पाठवते. त्या स्तरावर परस्परविरोधी वनहक्क मागणीबाबत निर्णय घेतला जातो.**

### * सामूहिक वन संसाधन हक्क प्रक्रियेत कोणते टप्पे पार करावे लागतात?

संरक्षित वन, राखीव वन, अभयारण्य व राष्ट्रीय उद्यांनाचा वन संसाधन हक्कामध्ये समावेश होतो. जंगल वापर, संवर्धन, व्यवस्थापन करण्याच्या समुदायाच्या हक्कावर त्यातून शिक्कामोर्तब होतं.

हा हक्क मिळवण्यासाठी पुढील टप्पे पार करावे लागतात –

- दावा करण्याची प्रक्रिया सुरू करण्याची तारीख ठरवणं
- दाव्यात असलेलं वनक्षेत्र शेजारची गावं वापरत असतील तर त्यांना दाव्याची कल्पना देणं
- गावाच्या सीमांची नेमकी व अचूक माहिती असलेल्या गावातल्या वयस्कर व्यक्तींच्या सोबतीने सामूहिक वनांच्या सीमा निश्चित करणं
- वनाची सीमा दाखवणारा (हाताने तयार केलेला किंवा जीपीएस यंत्रणेच्या सहाय्याने मिळवलेला) नकाशा तयार करणं
- गाव व वन नकाशा, सॅटेलाईट इमेजरी, टोपोशीट असे नकाशे महसूल व वन विभागाकडून मिळू शकतात. तेही शक्य असल्यास मिळवणं
- ग्रामसभेच्या वतीने वन हक्क समितीने ‘फॉर्म सी’ भरणं. त्यासोबत वर नोंदवलेले शक्य ते सर्व प्रकारचे नकाशे व नियमानुसार अपेक्षित असलेले कोणतेही दोन पुरावे जोडून दावा दाखल करणं
- दाखल झालेल्या दाव्याची समितीकडून पडताळणी होऊन निष्कर्ष अहवाल तयार होणं
- अहवालावर चर्चा करून ग्रामसभेने ठराव पारित करणं
- ग्रामसभेचा ठराव, समितीचा निष्कर्ष अहवाल आणि दावा उपविभाग स्तरीय समितीकडे पाठवणं.

✻✻✻

# वनहक्क मान्यता प्रक्रियेविषयी

* **वन हक्क मान्यता प्रक्रियेत मुख्य भूमिका कोणाची असते?**

  ग्रामसभा

* **वन हक्काच्या संदर्भात ग्रामसभेने कोणती कामं करायला हवी?**
  - वन हक्कांचं स्वरुप व व्याप्ती निर्धारित करण्याची प्रक्रिया सुरू करणं
  - सामूहिक वनसंसाधनांचं क्षेत्र निश्चित करणं
  - सामूहिक दावा तयार करण्यासाठी आवश्यक माहिती व कागदपत्रं मिळवणं
  - वन हक्कांच्या मागणीदारांची यादी तयार करणं
  - वन हक्काशी संबंधित दावे प्राप्त करुन त्यांची सुनावणी करणं
  - हितसंबंधी व्यक्ती/समूह व संबंधित प्राधिकरण यांना वाजवी संधी दिल्यानंतर वन हक्क मागण्यांचा निर्णय संमत करणं व तो उपविभागस्तरीय समितीकडे पाठवणं
  - पुनर्वसाहतींची पॅकेजेस विचारात घेणं व यथोचित निर्णय संमत करणं
  - वन्यजीवन वन व जैविक विविधतेचं संरक्षण करण्यासाठी समिती स्थापणं
  - सर्वांच्या सहभागाने कायद्याबद्दलची समज निर्माण करणं, वाढवणं
  - अभ्यासगट तयार करुन सर्व महसूल / वन अभिलेख वाचणं
  - कायद्याच्या अंमलबजावणीसाठी वन हक्क समिती स्थापन करणं.

* **वन हक्क मान्यता प्रक्रियेचे तांत्रिक टप्पे कोणते?**

  **१. मान्यता प्रक्रियेसाठी पुढील समित्या बनवल्या जातात –**
  - गाव पातळी – वन हक्क समिती

- तालुका पातळी – उपविभाग स्तरीय समिती
- जिल्हा पातळी – जिल्हास्तरीय समिती
- राज्य पातळी – राज्यस्तरीय संनियंत्रण समिती

**२. गाव पातळीवरच्या मान्यता प्रक्रियेचे टप्पे पुढीलप्रमाणे –**

- वन हक्क दावे मागवण्यासाठी ग्रामसभा ही वन हक्क समितीला अधिकृत करते
- दावे मागवलेल्या तारखेपासून ३ महिन्यांच्या आत ते दाखल व्हावे लागतात
- ग्रामसभेस गरजेनुसार हा कालावधी वाढवण्याचा अधिकार असतो
- या कालावधीत गावकऱ्यांकडून वन हक्क मागणी अर्ज पुराव्यांसह दाखल होतात
- वनहक्क समिती सर्वांच्या सोयीची तारीख निश्चित करते
- त्या तारखेस प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी व दाव्याची पडताळणी होते
- समिती ग्रामसभा बोलवते
- दाव्यांसंदर्भातील लेखी निष्कर्ष ग्रामसभेसमोर मांडते
- त्याबाबत ग्रामसभेचा ठराव घेतला जातो
- समिती ग्रामसभेच्या ठरावासह सर्व वनहक्क अर्ज पुढच्या कार्यवाहीसाठी उपविभागीय समितीकडे पाठवते
- उपविभागीय समिती सर्व अर्जांची पडताळणी करते
- समिती स्वत:च्या लेखी निष्कर्षांसह सर्व अर्ज जिल्हा समितीकडे पाठवते
- या टप्प्यावर २ पर्याय असतात –

  १. दावा योग्य त्या निष्कर्षासह जिल्हा समितीकडे पाठवला जातो.

२. गरज असल्यास, कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी किंवा पुन:पडताळणीसाठी दावा ग्रामसभेकडे परत पाठवला जातो.

- जिल्हा समिती वन हक्क दावा पूर्णपणे किंवा काही अंशी मान्य किंवा अमान्य करण्याचा निर्णय घेते.

**✻ वन हक्क समितीच्या सर्व कामांना ग्रामसभेची मंजुरी लागतेच का?**

हो!

वन हक्क समितीने सर्व कामं ग्रामसभेच्या मान्यतेने पार पाडणं अपेक्षित आहे.

**✻ दाव्याबाबत ग्रामसभेचा निर्णय मंजूर नसेल तर?**

- पोटकलम (३) अन्वये स्थापन केलेल्या उपविभागस्तरीय समितीकडे विनंती अर्ज करता येतो. अर्जावर विचार करुन समिती त्यावर निर्णय घेते.
- ग्रामसभेद्वारे निर्णय संमत झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत विनंती अर्ज दाखल केला गेला पाहिजे.
- अर्जदारास बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज असा कोणताही विनंती अर्ज निकालात काढला जाऊ शकत नाही.

✻✻✻

# वनहक्क समितीविषयी

✻ **गावपातळीवर वन हक्क दावा कुणाकडे दाखल करायचा असतो?**

गावपातळीवर ग्रामसभेने स्थापन केलेल्या वन हक्क समितीकडे दावा दाखल करायचा असतो. ग्रामसभेची कार्यकारी समिती या भूमिकेतून वन हक्क कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी गाव पातळीवर वन हक्क समिती स्थापन केली जाणं आवश्यक असतं.

✻ **वन हक्क समितीचा कायदेशीर आधार कोणता?**

- अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी अधिनियम, २००६
- नियम २००८ मधील नियम ४ (१ )ड
- सुधारित नियम २०१२

✻ **समितीची मुख्य जबाबदारी कोणती?**

वन हक्क कायद्याच्या अंमलबजावणीतील प्रशासकीय कामं करणं

✻ **गावपातळीवर समितीची स्थापना कशी केली जाते?**

- वन हक्क समितीची स्थापना ग्रामसभा करते
- हक्क नोंदींच्या दाव्यासाठी बोलवलेली पहिल्या ग्रामसभेने सदस्य निवडणं अपेक्षित आहे
- अशा ग्रामसभांना २/३ गणसंख्या आवश्यक आहे
- या ग्रामसभेच्या सचिवपदी ग्रामसेवक असतो
- ग्रामसभेने निवडलेल्या सदस्य व पदाधिकाऱ्यांच्या यादीसह ठराव संमत केला जावा

- हा ठराव उपविभागीय अधिकाऱ्यांकडे पाठवावा
- गट ग्रामपंचायत असेल तर, प्रत्येक महसूल गावासाठी त्याच गावच्या लोकांकडून स्वतंत्र वन हक्क समिती स्थापन करण्यात यावी.

## * समितीच्या सदस्यांची निवड कशी करावी ?

- समिती सदस्य संख्या – कमीत कमी १० , जास्तीत जास्त १५
- समितीत अनुसूचित जमातीचे किमान ६६ टक्के सदस्य
- समितीत किमान ३३ टक्के महिला सदस्य
- सदस्यांनी बहुमताने समितीचे अध्यक्ष, सचिव, खजिनदार निवडावे
- समितीच्या अध्यक्षपदी अनुसूचित जमातीतील व्यक्ती असावी
- समितीत एक महिला पदाधिकारी आवश्यक – म्हणजे अध्यक्ष, सचिव किंवा खजिनदार यापैकी किमान एका पदावर महिला असली पाहिजे
- सदस्य निवडीच्या माध्यमातून ग्रामसभेतील सर्व वन हक्कधारकांचं प्रतिनिधित्व समितीने करणं अपेक्षित आहे.

## * गावपातळीवरच्या वन हक्क समितीची कामं व जबाबदाऱ्या

१. वन हक्क दावे
   - दावेदारांचे अर्ज व पुरावे स्वीकारणं व त्याची लेखी पोच देणं
   - दाव्याची पडताळणी करून त्याबद्दल अर्जदार व वनविभागास माहिती देणं
   - अर्जदार दाव्यासाठी पात्र आहे की नाही हे ठरवणं व तसा लेखी निष्कर्ष ग्रामसभेपुढे मंजुरीसाठी ठेवणं

२. सामूहिक वन जैवविविधतेचं रजिस्टर अद्ययावत ठेवणं

३. सामूहिक वन संपत्तीचं संवर्धन व व्यवस्थापन यासाठी योजना आखणं

४. जमीन, पाणी व वन व्यवस्थापनाचा परिणामकारक आराखडा बनवणं

५. वन हक्क कायद्याशी सुसंगत नियमावली तयार करणं

६. वाहतूक परवाना, उत्पादन विक्री उत्पन्न, व्यवस्थापन आराखडा बदलाच्या निर्णयांना मान्यता देणं

७. किमान आधारभूत किमतीपेक्षा कमी दराने गौण वनोपजाची विक्री होणार नाही, याची दक्षता घेणं

८. नैसर्गिक साधनसंपत्तीचा विक्री महसूल व शासकीय निधी यावर बँक खात्याद्वारे देखरेख ठेवणं

९. समितीची सर्व कागदपत्रं, बँक खातं व हिशेब सांभाळणं

१०. वन हक्काशी संबंधित कामं, खर्च व निधी याविषयीचा अहवाल ग्रामसभेस सादर करणं

११. समितीच्या कामाची कागदपत्रं व फ्रोटो ग्रामसभेला सादर करणं

१२. समितीने हाती घेतलेल्या व पूर्ण केलेल्या सर्व कामांचा तपशील ग्रामसभेत बोर्डावर दाखवणं

१३. वन हक्क कायदा व धोरण याविषयी ग्रामसभेस माहिती व प्रशिक्षण देणं

## * वन हक्क समितीने आर्थिक व्यवहार कसे करावेत?

- अध्यक्ष, सचिव व खजिनदार यांनी संयुक्त बँक खातं उघडावं
- या तीनपैकी दोन पदाधिकाऱ्यांच्या सहीने व ग्रामसभेच्या मान्यतेने सर्व व्यवहार हाताळावे
- हिशेबाची पुस्तकं, धनादेश, कामकाजाची कागदपत्रं ग्रामसभेच्या कार्यालयात ठेवावी
- सर्व व्यवहार ठरावानुसार व 'अकाऊंट पेयी' चेकने करावे

- संयुक्त खातेदारांनी किरकोळ रक्कम किती बाळगावी हे ग्रामसभेने ठरवावं
- समितीने सर्व व्यवहारांचे हिशेब ग्रामसभेसमोर ठेवावे
- हिशेब तपासणी जिल्हा परिषदेच्या स्थानिक लेखा निधीच्या तपासनीसाकडून व्हावी.

## ❋ उपविभाग स्तरीय वन हक्क समिती कशासाठी?

- ग्रामसभेकडून प्राप्त वैयक्तिक व सामूहिक वन हक्क दाव्यांची पडताळणी करण्यासाठी.
- हे दावे शिफारशीसह अंतिम निर्णयाकरिता जिल्हा वन हक्क समितीकडे सादर करण्यासाठी

## ❋ समितीची रचना

- या समितीची स्थापना राज्य सरकार करतं
- उपविभागीय अधिकारी हे या समितीचे अध्यक्ष असतात
- सह वनसंरक्षक हे या समितीचे सदस्य असतात
- जिल्हा परिषदेने नेमलेले ३ पंचायत समिती सदस्य हे या समितीचे सदस्य असतात. यापैकी २ आदिवासी तर १ महिला सदस्य असणं अपेक्षित असतं
- प्रकल्प अधिकारी (ए. आ. वि. प्र.) हे या समितीचे सचिव असतात.

## ❋ समितीच्या जबाबदाऱ्या

- ग्रामसभेस वनहक्कांच्या संदर्भातील तिची कर्तव्यं व जबाबदाऱ्या याविषयी माहिती देणं
- ग्रामसभा किंवा वन हक्क समितीला वन व महसूल नकाशे, यादी पुरवणं
- ग्रामसभांच्या निर्णयांची पडताळणी करणं

- ग्रामसभेने पुरवलेले नकाशे व तपशील एकत्रित करणं
- दाव्यांच्या खरेपणाची खात्री करण्यासाठी ग्रामसभेचे निर्णय व नकाशे तपासणं
- वनहक्क स्वरूप, विस्ताराविषयी ग्रामसभेतील निविदांची सुनावणी करून अधिनिर्णय देणं
- ग्रामसभेच्या निर्णयांनी व्यथित झालेल्या व्यक्ती व राज्य अभिकरणांनी केलेल्या विनंती अर्जाची सुनावणी करणं
- उपविभागीय अधिकाऱ्यांद्वारे प्रस्तावित वन हक्कांच्या अभिलेखाच्या मसुद्यासह दावे अंतिम निर्णयासाठी जिल्हास्तरीय समितीकडे पाठवणं
- वन हक्कांविषयी आदिवासी / वन निवासी समाजात जनजागृती करणं
- ग्रामसभेच्या बैठका आवश्यक गणपूर्तीसह मुक्त खुल्या वातावरणात व योग्य रीतीने होत असल्याची खात्री करणं.

## ✻ जिल्हास्तरीय वन हक्क समिती कशासाठी ?

जिल्हयातले वन हक्कांचे दावे अंतिम निकाली काढण्यासाठी

## ✻ समितीची रचना

- या समितीची स्थापना राज्य सरकार करतं
- जिल्हाधिकारी हे या समितीचे अध्यक्ष असतात
- उप वनसंरक्षक हे या समितीचे सदस्य असतात
- जिल्हा परिषदेने नेमलेले ३ जिल्हा परिषद सदस्य हे या समितीचे सदस्य असतात. यापैकी २ आदिवासी तर १ महिला सदस्य असणं अपेक्षित असतं
- उप जिल्हाधिकारी (महसूल) हे या समितीचे सचिव असतात.

## ✻ समितीच्या जबाबदाऱ्या

- ग्रामसभा व वन हक्क समित्यांना वनहक्कांच्या संदर्भातील आवश्यक माहिती पुरवण्यात आली असल्याची खात्री करणं.
- आदिम, आदिवासी समूह, फिरते आदिवासी आणि भटक्या जमातींच्या मागण्या व वनहक्क यांची दखल घेऊन कार्यवाही केली जात असल्याची खात्री करणं.
- उप विभागीय समितीने पाठवलेले वन हक्क दावे व दस्त ऐवज विचारात घेऊन अंतिम मान्यता देणं.
- उपविभागीय समितीच्या निर्णयांनी व्यथित झालेल्या व्यक्तींच्या विनंती अर्जावर सुनावणी करून निर्णय देणं.
- जिल्हा समितीने मंजूर केलेल्या वन हक्काचे अभिलेख (प्रमाणपत्र / पट्टे) वाटप करणं
- मान्य वनहक्काचा समावेश शासकीय दस्त ऐवज करण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना निर्देशित करणं.

## ✻ राज्यस्तरीय संनियंत्रण समिती कशासाठी ?

- वन हक्क मान्य करण्याच्या प्रक्रियेत सामील असलेल्या समित्या व विभाग या सर्वांचं संनियंत्रण करणं आणि दावेदारांच्या वन हक्कांना मान्यता देऊन ते विहित करण्यासाठी

## ✻ समितीची रचना

अध्यक्ष– मुख्य सचिव

सचिव – आयुक्त, आदिवासी कल्याण

सदस्य– सचिव, महसूल विभाग

सदस्य– सचिव, आदिवासी विकास / समाजकल्याण विभाग

सदस्य– सचिव, वन विभाग

सदस्य– प्रधान मुख्य, वन संरक्षक

सदस्य– सचिव, ग्रामविकास विभाग

सदस्य– अनुसूचित जमाती सल्लागार परिषदेच्या अध्यक्षांनी निवडलेले ३ आदिवासी सदस्य व जिथे अशी परिषद नसेल, तिथे राज्य शासनाने निवडलेले ३ आदिवासी सदस्य

सचिव– आयुक्त, आदिवासी कल्याण किंवा समतुल्य अधिकारी

✻✻✻

# वन व्यवस्थापन समितीविषयी

**✻ गावपातळीवर वन व्यवस्थापन समिती कशासाठी असते?**

वन हक्क प्रस्थापित झाल्यावर लोकसहभागातून वन संरक्षण व वन विकास करण्यासाठी

**✻ वन व्यवस्थापन समितीच्या जबाबदाऱ्या कोणत्या?**

- वनाचं, वन्यजीवांचं, जैवविविधतेचं संरक्षण, संवर्धन व व्यवस्थापन संयुक्तपणे करणं
- सामूहिक वन संसाधनांच्या संवर्धन व व्यवस्थापनासाठी व्यवस्थापन आराखडा बनवणं
- हा आराखडा योग्य त्या सूचनांसह वन विभागाच्या सूक्ष्म नियोजन आराखड्यात समाविष्ट करणं

  सूक्ष्म नियोजन आराखड्याची योग्य रीतीने अंमलबजावणी करणं
- समितीला वर्ग करण्यात आलेल्या वनक्षेत्रात निसर्ग पर्यटनास चालना देणं. त्यासाठी राज्याच्या निसर्ग पर्यटन धोरणानुसार योजना आखणं व राबवणं

  पर्यटकांकडून उपद्रव व प्रवेश शुल्क वसूल करणं. ते पर्यटनस्थळाची स्वच्छता व नैसर्गिक समतोल साधण्यासाठी उपयोगात आणणं
- वन गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वन अधिकाऱ्यांना सहकार्य करणं

  अवैध वृक्षतोड, चराई, वणवा, शिकार अशा प्रकरणी दंडनिहाय कारवाई करणं
- इतर विभागांशी समन्वय साधून ग्रामविकासाच्या योजना आखणं व राबवणं

## ✻ वन व्यवस्थापन समितीची स्थापना कशी करावी?

- ग्रामसभेत ही समिती स्थापन करण्यात येते
- समितीच्या निर्मितीचा ठराव ग्रामसभा पारित करून स्थानिक वन क्षेत्रपालांकडे पाठवते
- समितीची रचना महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५८ कलम ४९ला अनुसरून असते

  समितीचा कालावधी पंचायतीच्या कालावधीशी सुसंगत असतो

  ग्रुप ग्राम पंचायतीत प्रत्येक वस्ती / पाड्याची स्वतंत्र वन व्यवस्थापन समिती तयार करता येते
- वनपाल/वनरक्षक ही समितीचे पदसिद्ध सदस्य–सचिव असतात.

## ✻ वन व्यवस्थापन समितीने आर्थिक व्यवहार कसे करावेत?

आर्थिक व्यवहारासाठी २ बचत खाती उघडणं आवश्यक असतं.

१. सरकारी खातं

- ■ राष्ट्रीयीकृत बँक किंवा पोस्ट ऑफिसात हे संयुक्त बचत खातं उघडावं लागतं
- ■ सरकारकडून मिळणारा निधी यात जमा होतो
- ■ संयुक्त समितीचे अध्यक्ष आणि सचिव संयुक्तपणे या खात्याद्वारे व्यवहार करू शकतात.
- ■ या खात्यातील सर्व व्यवहारास उप वनसंरक्षक (प्रादेशिक) यांची मंजुरी मिळावी लागते.

**२. वन व्यवस्थापन समिती खातं**

- ■ राष्ट्रीयीकृत बँक किंवा पोस्ट ऑफिसात स्वतंत्ररित्या बचत खातं उघडावं लागतं

- इतर स्त्रोतांकडून आणि समितीच्या स्वत:च्या उत्पन्नातून प्राप्त निधी यात जमा होतो
- संयुक्त समितीचे अध्यक्ष आणि कोषाध्यक्ष किंवा कार्यकारिणीतील एक सदस्य संयुक्तपणे या खात्याद्वारे व्यवहार करू शकतात
- या खात्यातील सर्व व्यवहारास ग्रामपंचायतीच्या आमसभेची मंजुरी मिळावी लागते.

## ✻ समितीसाठी वनक्षेत्राची निवड करताना कोणत्या गोष्टींचा विचार केला जातो?

- ग्रामीण परिसरातील राष्ट्रीय उद्यानं व अभयारण्य सोडून इतर भागातील अप्रगत, अवनत वनक्षेत्र आणि वनेतर क्षेत्राचा विचार केला जातो.
- ४० टक्क्यांवर घनता असलेल्या वनांचाही विचार होऊ शकतो.
- समितीतील सदस्यांची संख्या विचारात घेतली जाते.
- वनाची उत्पादन क्षमता, वनक्षेत्रातील पर्यटनस्थळं अशा बाबी लक्षात घेतल्या जातात.
- गावठाणापासून ३ किमीपर्यंतचं क्षेत्र समितीकडे सोपवण्याबाबत विचार होतो.
- एकापेक्षा अधिक गावं असल्यास दोन गावांच्या मध्यभागापासून ग्रामस्थांच्या सहकार्याने क्षेत्रनिश्चिती केली जाते.

✻✻✻

# वनहक्क मिळवणाऱ्या व्यक्ती व समूहांच्या अधिकार व जबाबदाऱ्यांविषयी

## * वन हक्कामुळे व्यक्ती / समूहांना कोणते अधिकार मिळतात?

- वननिवासी समूहांना शाश्वत सामुदायिक वनसंवर्धन आराखडा तयार करून राबवता येतो
- जैविक विविधतेचा वापर करण्याचा हक्क मिळतो
- अभयारण्य तसंच इतर संरक्षित क्षेत्रातही वन हक्क मागता येतात
- जैविक व सांस्कृतिक विविधतेच्या सामूहिक पारंपरिक ज्ञान व बौद्धिक संपदेचा अधिकार मिळतो
- अभयारण्य व राष्ट्रीय उद्यानात 'अतिसंवेदनशील वन्य जीवांचं निवासस्थान' परस्पर घोषित करता येत नाही. तसं घोषित करण्याआधी त्याचा शास्त्रीय अभ्यास करणं व स्थानिक लोकांशी चर्चा करून ग्रामसभेचा लेखी ठराव घेणं संबंधितांसाठी बंधनकारक ठरतं.
- वन जमिनीवर कोणताही प्रकल्प परस्पर उभारता येत नाही. त्यापूर्वी स्थानिकांची वन हक्क मान्यतेची प्रक्रिया पूर्ण करणं व आधी ग्रामसभेची लेखी संमती मिळवणं संबंधितांसाठी बंधनकारक ठरतं.
- कोणतीही सरकारी किंवा बिगर सरकारी कामं, भाडेकरार किंवा वन व्यवस्थापन आराखड्याची अंमलबजावणी परस्पर होऊ शकत नाही. त्यासाठी संबंधितांना स्थानिक ग्रामसभेची संमती घ्यावी लागते.
- समूह, समाज, संस्कृती, परंपरा, जंगल, वन्यजीव यांच्यासाठी धोकादायक अशा विकासकामांच्या किंवा प्रकल्पांच्या विरोधात आवाज उठवता येतो.

**✻ वन हक्क मिळाल्यावर व्यक्ती / समूहांनी कोणत्या जबाबदाऱ्या पार पाडणं अपेक्षित आहे?**

- वन्यजीव, वन संरक्षण, सामूहिक जंगलाविषयी ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयाचं पालन करणं
- जंगल, वन्यजीव, जैवविविधतेचं रक्षण करणं
- वनातली पाण्याची ठिकाणं, पर्यावरणीय दृष्टीने अतिसंवेदनशील ठिकाणांचं संरक्षण करणं
- वन निवासींचं निवासस्थान, सांस्कृतिक व नैसर्गिक वारशाचं रक्षण करणं.
- इतर विभागांशी समन्वय साधून ग्रामविकासाच्या योजना आखणं व राबवणं

✻✻✻

# गरज प्रभावी अंमलबजावणीची!

वन हक्क कायदा हा आदिवासींच्या आणि आदिवासी स्वशासनाच्या दृष्टीनेच नाही तर आपल्या देशाच्या लोकशाही व्यवस्थेच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. प्रातिनिधिक लोकशाहीकडून लोकसहभागावर आधारलेल्या प्रत्यक्ष लोकशाहीच्या दिशेने मार्गक्रमण करण्याच्या वाटेवरचं हे एक महत्त्वाचं पाऊल आहे या कायद्याबाबत, या कायद्याच्या इतिहासाबाबत आणि या कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भातल्या कामगिरीबाबत जी वस्तुस्थिती आहे ती समोर आणत राहणं तसंच या कायद्याच्या प्रामाणिक अंमलबजावणीसाठी जनजागृती करणं, जनमत संघटित करणं हे म्हणूनच विशेष महत्त्वाचं आहे. आदिवासी समाजाच्या अधिकारांवर शिक्कामोर्तब करणाऱ्या 'पेसा' कायद्याचा आधार घेत, त्याची वन हक्क कायद्याशी सांगड घालत पुढे गेलं तर या संदर्भातल्या न्यायाच्या लढाईला अधिक धार येऊ शकेल. कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीला अधिक रेटा मिळू शकेल. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर वन हक्क कायद्याच्या रूपाने आदिवासींना त्यांचे हक्क परत मिळाले आहेत. त्यामुळेच आदिवासींचं मागासलेपण दूर करून त्यांना समुचित विकासाची न्याय्य संधी देण्यासाठी या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्याला पर्याय नाही, हे आपण साऱ्यांनीच समजून घेण्याची नितांत आवश्यकता आहे.

***




Shot on vivo Z1Pro
Vivo AI camera
2022.03.10 11:35


2022.07.16 12:38







''इकोनेट, पुणे ही संस्था १९९३ पासून महाराष्ट्रात पर्यावरण संवर्धन संरक्षण, समुदाय विकास, मनुष्य व संस्था नेतृत्व बांधणी या विषयावर महाराष्ट्रासह देशातील अन्य भागात सामाजिक कार्य करीत आहे विशेषतः आदिवासी व भटका विमुक्त सुमदाय हे संस्थेच्या कामाचे मुख्य बिंदू आहेत. ऐतिहासिक नालबंदीच्या जोरवडातून महाराष्ट्रातील भटक्या विमुक्त समुदायाला बाहेर काढतांना नागरिकत्वाचे दाखले, शिक्षण, आरोग्य, रोजगार, उपजिविका, युवा नेतृत्व बांधणी, महिला नेतृत्व बांधणी, संस्था विकास, अशा अनेक विषयांवर संस्था कार्यरत आहे. भारतीय राज्य घटनेतील अनुसुची क्रमांक ५ मध्ये येणाऱ्या महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रात वन हक्क व पेसा या दोन महत्त्वाच्या कायद्यांची समज, माहिती व अमंलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी इकोनेट गेली २० वर्षे काम करित आहे. हे काम करतांना स्थानिक संस्था, ग्राम सभा व आदिवासी व्यक्ती यांच्या सोबत एका शिस्तबद्ध प्रशिक्षणाच्या माध्यमातून स्थानिक आदिवासी समुदायातील कार्यकर्ते तयार करून, एकंदर आदिवासी स्वःशासन संकल्पनेला इकोनेट प्रत्यक्षात उतरवण्याचा प्रयत्न करीत आहे. इकोनेट ही संस्था आज महाराष्ट्रातील १९ जिल्ह्यात जवळपास ४२ भटक्या विमुक्त व ९ आदिवासी समुदायांच्या सोबत कार्यरत आहे. इकोनेटचे ध्येय आदिवासी व भटक्या विमुक्त समुदायांना त्यांचे संविधानिक व कायदेशीर अधिकार प्राप्त करून त्यांना लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात आणणे व त्यांना सामाजिक, आर्थिक व राजकीय दृष्ट्या सक्षम करणे व त्यांच्या सहभागातून भटक्या विमुक्त व आदिवासी समुदायांचा शाश्वत विकास करणे हे आहे.

समुदायातील लोकांना वनहक्क कायदा आणि त्यातील तरतुदी सोप्या आणि सहज समजून त्याचा त्यांना लाभ घेता यावा या उद्देशाने या माहिती पुस्तिकेचे निर्माण करण्यात आलेले आहे.

ECONET


## इकोनेट

फ्लॅट नं. २, गुलमोहर ओरीयन,
एस.आर.पी.एफ. गेट नं १ जवळ,
सर्व्हे नं. ११०/अ/९, रामटेकडी रोड,
हडपसर, पुणे : ४११ ०१३, महाराष्ट्र.
फोन : (+९१) ७४२००२७७५५
ईमेल : econet.pune@gmail.com
वेबसाईट : www.econetindia.org